International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# शासकीय योजनेतून पूर्व विदर्भातील 'मलकाझरी खेडेगावाचा शाश्वत विकास' एक चिकीत्सक अभ्यास

डॉ.अमित गायधनी
प्राध्यापक,विदर्भ कला,वाणिज्य महाविद्यालय लाखनी जि.भंडारा
E-mail:-amitgaidhani@gmail.com

## प्रस्तावना :-

१८ व्या शतकापर्यंत भारत हा स्वयंपुर्ण गावांचा देश म्हणून ओळखला जात होता.कारण त्यावेळी गावामध्ये आवश्यक असलेल्या वस्तू ही गावातच तयार होऊन गावातील लोकांच्या उपयोगात आणली जात होती. त्यामुळे वस्तु विनियम केला जायचा.व भारत दुस-या देशांशी व्यापार करतांना मसाले पदार्थाच्या सोने घेऊन व्यवहार करित असे.नंतरच्या काळात बिट्रिश कपंनीची स्थापना भारतात झाल्यावर प्रत्येक वस्तुची मुल्य ब्रिटिश कंपनी निर्धारीत करून त्यावर मोठया प्रमाणात कर आकारण्यात येत असे. त्या तुलनेत ब्रिटिश कंपनीची वस्तु कमी किंमतीत बाजारात मिळत असे परिणामी भारतीय खेडे गावातील व्यापार या औघोगिक करणाचा धोरणात पूर्णपणे मोडकळीस आला.भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर पंचवार्षिक योजनेअंतर्गत शेती व सिंचन व्यवस्थाच्या माध्यमातून खेडे गावातील शेतक-यांना पुन्हा सशक्त करण्यासाठी विविध योजना शासनाने राबविल्या आहे. त्यामध्ये शिक्षणाचा मुलभूत अधिकार, सिंचनासाठी नदीवर बंधारे बांधणे, ग्रामीण भागातील रोजगारासाठी रोजगार हमी अंतर्गत गावाचा विकास साधने असा विविध योजनेतून दिल्ली पासून खेडयापर्यंत विविध योजनांची अंमलबजावणी होऊ लागली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अर्ध शतक ओलांडल्यावर शासकीय योजना शेतक-यांसाठी कितपत लाभ कारी ठरली, यासाठी पूर्व विदर्भातील एक आदिवासी गाव आज आपण आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षणासाठी लाखनी तालुक्यातील मलकाझरी या गावाची निवड करण्यात आली.

## सर्वेक्षणाचा उद्देश :-

भूगोल विषयाची व्याप्ती जशी जशी वाढत गेली तेव्हा भूगोलाची व्याख्या सुद्धा बदलत गेल्या असे म्हटले जाते. भूगोल हे क्षत्रिय अध्ययनाचे शास्त्र आहे. त्यामुळे या क्षेत्रातील भूमी उपाययोजनाची सांस्कृतिक व आर्थिक घटकांच्या विकास कसा होत आहे . हे पाहणे अगत्याचे ठरले. यासाठी लाखनी तालुक्यातील रस्त्याची सुगंमता व आदिवासी बहुल लोकसंख्येचा विचार करून मलकाझरी गावाची निवड करून शासकीय योजनेचा या गावातील शेतक-यांच्या आर्थीक तसेच सामाजिक घटकांवर कसा परिणाम झालेला आहे. हे अभ्यासने हा या सर्वेक्षणाचा प्रमुख उद्देश आहे.

## कामाचे स्वरूप व कालावधी :-

सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रश्नावली तयार करून १०/०१/२०२२ ला मल्काझरी या गावाचे सर्वेक्षण करण्यासाठी सकाळी ८.०० वाजता या गावाला भेट दिली.

सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष मुलाखत पद्धतीने कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती विषयी माहिति मिळविली आहे. यासाठी तीन तीन

विद्यार्थ्यांचा गट करून गावातील कुटुंबात जावून मुलाखत घेण्यात आली. व गावक-यांना प्रश्न विचारून सर्वेक्षण करण्यात आले. यानंतर सर्वेक्षण करून मिळालेल्या माहितीचे सादरीकरण वर्गीकरण करण्यात आले. सर्व प्रश्नावली एकत्रित करून मिळालेल्या आकडेवारीचे वर्गीकरणाच्या आधारावर प्रस्तुत अहवाल तयार करण्यात आला.

## गावाचे स्थान :-

महाराष्ट्राच्या ईशान्य सिमेवरील मलकाझरी हे ठिकाण भंडारा जिल्हातील लाखनी तालुक्यातील लाखनीवरून १३ कि.मी अंतरावर दक्षिणेस आहे.

**संशोधन सुचक शब्द** :- भौगोलिक हवामान , शेतक-याची सामाजिक सरंचना व आर्थिक

परिस्थिती , शासकीय सोईसुविधेचे लाभार्थी

## हवामान:-

संशोधन स्थळाचे हवामान उष्ण असून किमान तापमान ७ अंश व कमाल तापमान ४७ अंश पर्यतं असते. साधारणता भंडारा जिल्हायापासून समुद्र ९०० कि.मि. अंतरावर असल्याने वातावरण उष्ण व विषम स्वरूपाचे असल्याचे दिसून येते.त्यामुळेच येथील वनस्पती पाणझडी स्वरूपाची आहे.

## पर्जन्यमान :-

भंडारा जिल्हयातील पर्जन्य १३०० ते १४०० मि.मि. पर्यंत होत असल्याने या भागात पावसाळा हा अतिवृष्टीचा असतो. त्यामुळे या भागात धान,उस, यासारखे पिक घेतले जातात.

## मृदा :-

भंडारा जिल्हायातील मृदा अग्निजन्य खडका पासून तयार झाल्याने काही प्रमाणात लाल रंगाची आहे. येथील मृदा पोयटयाची असल्याने अधिक काळा पर्यंत पाणि धरून ठेवण्याची क्षमता असते. तसेच येथील वातावरण व जमिन भात शेती साठी आदर्श मानली जाते.

## आर्थिक संरचना :-

### अ) व्यवसाय :-

मानवाचे आर्थिक व्यवसाय पर्यावरणासी निगडीत असले तरी बहुतेक आर्थिक क्रिया मानवाच्या शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर अवलबूंन असतात मलकाझरी या गावात प्रामुख्याने जंगली भागातील मध,मोह,डिंक ,तेंदुपत्ता ,लाकूडतोड इत्यादी मेहनती कामात गुंतलेले आहेते.प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या कुंटुबाची संख्या (शेती) अधिक असून सोबतच मजूरी करणा-यांची संख्या जास्त आहे.

## मलकाझरी गावातील आर्थिक संरचना सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२

| अ क | व्यवसायाचे स्वरूप | कुटुंब संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | १० | १८.५१ |
| २ | मजुरी | ४४ | ८१.४९ |
| | एकूण | ५४ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वर दिलेल्या आकडेवारीचे विवेचन केल्यास असे दिसून येते की, शेती व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबाची संख्या अधिक आहे. म्हणजेच १८.५१ टक्के असून त्यांचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक कुटुंबाची वडिलोपार्जित जमिन असून या जामिनीचा उपयोग उदरनिर्वाहाचे साधन म्हणून केला जातो. म्हणजेच त्याचप्रमाणे काही कुटुंबाकडे थोडया प्रमाणात जमीन आहे. पण त्याचे त्यावर उदरनिर्वाह होवू शकत नाही. म्हणून घरकाम, हमाली ,शेतमजूर, लाकुडतोड हे कामे ते करीत असतात. वरील सर्वेक्षणानुसार ८१.४९ टक्के लोकांकडे शेती नाही त्यामुळे ते लोक पशुपालन व

कुटीर उदयोग करून व उत्पादित माल जवळील लाखनी या ठिकाणी विक्रीस आणतात व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.. हिवाळयात पाण्याची सोय असलेले शेतकरी गहू, हरबरा, चना, लाखोरी या सारखे रब्बी पीक घेतात.

## ब) सामाजिक संरचना :-

### वय व लिंग संरचना सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२

| अ क | वयोगट | पुरूष | स्त्री | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ० ते १५ | १२ | ११ | २३ | २८.३९ |
| २ | १५ ते ३५ | १७ | १३ | ३० | ३७.०३ |
| ३ | ३५ ते ६० | १० | ११ | २१ | २५.९२ |
| ४ | ६० पेक्षा जास्त | ०३ | ०४ | ०७ | ८.६४ |
| | एकूण | ४२ | ३९ | ८१ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील टक्केवारीच्या निरीक्षणावरून स्पष्ट होते. की मल्काझरी या गावची एकूण लोकसंख्या ८१ असून त्यात ४२ पुरूष व ३९ स्त्रिया आहेत. ० ते १५ वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी २८.३९ असून स्त्रियांची संख्या पुरूषापेक्षा थोडी कमी आहे.

१५ ते ३५ वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी ३७.०३ या वयोगटातील टक्क्वेवारी सर्वात जास्त असून या वयोगटातील स्त्रियांची संख्या पुरूषापेक्षा अधिक आहे.

३५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी २५.९२ या वयोगटातील स्त्रियांची लोकसंख्या पुरूषापेक्षा अधिक आहे.

६० पेक्षा अधिक वयोगटातील टक्केवारी ८.६४ असून या वयोगटातील पुरूषांची संख्या स्त्रियां व पुरूषाचे प्रमाणात अधिक आहे.

## क) साक्षरता प्रमाण

साक्षर लोकांची समजण्याची क्षमता निरक्षर लोकांपेक्षा अधिक समजल्या जाते. या साक्षरतेचा परिणाम राहणीमान व आर्थिक परिस्थितीवर होत असतो. सर्वेक्षणात प्राप्त झालेल्या आकडेवारीवरून पुढील सारणी तक्ता तयार केली आहे.

### मलकाझरी गावातील शैक्षणिक वितरण (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ क | शिक्षण | पुरूष | स्त्री | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ०६ | ०२ | ०८ | ९.८७ |
| २ | प्राथमिक | ०९ | १७ | २६ | २८.३९ |
| ३ | माध्यमिक | ०७ | १२ | १९ | २३.४५ |
| ४ | उच्च माध्यमिक | १० | ०४ | १४ | १७.२८ |
| ५ | ज्युनियर कॉलेज | ०४ | ०७ | ११ | १३.१८ |
| ६ | महाविघालय | ० | ०३ | ०१ | १.२३ |
| ७ | पदव्युत्तर | ० | ०० | ० | ०० |
| | एकूण | ३६ | ४५ | ८१ | १०० |

स्त्रोत :- ही आकडेवारी प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतली (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते की, एकूण लोकसंख्येपैकी माध्यमिक विद्यालयीन शिक्षण घेणा-याची संख्या जास्त आहे. प्राथमिक शिक्षण घेण्या-यंचे प्रमाण २८.३९ टक्के , माध्यमिक शिक्षण घेणा-राचे प्रमाण २३.४५ असून उच्च माध्य शिक्षण घेण्यायाचे प्रमाण १७.२८ टक्के आहे. कनिष्ठ महाविघालय शिक्षण घेण्यायाचे प्रमाण १३.१८ टक्के पदवी शिक्षण घेणा-याचे प्रमाण १.२३ आहे. शिक्षण न घेणा-याची संख्या ९.८७ टक्के आहे. प्रत्येक सर्वेक्षण केल्यानंतर असे लक्षात आले की, या गावामध्ये शिक्षितांची संख्या मोठया प्रमाणात आहे.

## ड) वस्ती संरचना :-

प्रत्येक सर्वेक्षणातुन मिळालेल्या आकडेवारीवरून पुढील सारणी तयार केली आहे.

मलकाझरी गावातील घरांची संरचना ( सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ क | घराचा प्रकार | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कवेलू घर | १३ | ८६.६६ |
| २ | स्लॉप घर | ०२ | १३.३४ |
| | एकूण | १५ | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वरील सारणीवरून स्पष्ट होते की, मातीच्या घरांची संख्या या गावात जास्त असून कवेलूच्या घराचे प्रमाण ८६.६६ टक्के आहेत. येथील गावक-यांच्या राहणीमानाचा दर्जात सुधारणा झालेली आहे.

## इ) कुटुंब नियोजन जनजागृतीची माहिती :-

सर्वेक्षणाच्या आधारावर प्राप्त झालेल्या आकडेवारीकरून पुढील सारणी तयार केलेली आहे.

मलकाझरी गावातील कुटुंब नियोजन जनजागृतीची माहिती (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ क | कुटुंब नियोजन | केलेली | न केलेली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | | १७ | ०० | १७ |
| | टक्केवारी | १०० | ०० | १०० |

स्त्रोत :- प्रत्यक्ष सर्वेक्षणातून घेतलेली आकडेवारी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

वाढत्या लोकसंख्येसाठी शासनाने लोकांमध्ये केलेल्या जनजागृतीसाठी साक्षरता, वैदयकीय सुविधा यांचा लाभ १०० टक्के लोकांनी घेतला आहे. याचाच अर्थ असा की, आर्थीक परिस्थिती व कुटुंब संख्या याचा विचार करून शाश्वत विकासाची कल्पना लोकांमध्ये जागृत झाली आहे. असे या सर्वेक्षणातुन निदर्शनास येत आहे.

## ई) शासकीय सोईसुविधा

कृषी, विघुत पंपाचा लाभ घेणारे शेतकरी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)



Mr. Janrao Rakesh Rohidas

| अ. क्र | जात | लाभ घेणारे शेतकरी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ओ.बी.सी | ०३ | ३० |
| २ | अनु.जाती | ०१ | १० |
| ३ | विघुत कनेक्शन नसलेले | ०६ | ६० |
| | एकूण | १० | १०० |

शासनाने लोकांसाठी स्वस्त शेती, विघुत पुरवठा शेतक'यांचे आर्थीक परिस्थिती सुधारण्यासाठी करित असला तरी आजही या योजनेचा लाभ फक्त ४० टक्के लोकांनी घेतला आहे. तरी ६० टक्के लोक अजूनही या सुविधेपासून वंचित आहेत. यांना शासकीय योजनेच्या लाभार्थ्यामध्ये आणण्यासाठी शासनाला शहरापासून खेडयापर्यत लोक प्रतिनिधी व शासकीय कार्यालय यांच्याशी मेळ घालणा-या व्यक्तीची नियुक्ती कृषी अधिका-यांने कत्रांटी तत्वावर करण्याची आवश्यकता आहे.जेणेकरून कृषी उत्पादनात वाढ होऊन शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारले.

## प) शासकीय आवास योजना :-

मल्काझरी गावातील घरकुल योजने अंतर्गत लाभार्थी (सर्वेक्षण वर्ष २०२१-२०२२)

| अ. क्र | जात | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ओ.बी.सी | ०५ | १२.८२ |
| २ | अनु.जाती | ०९ | २३.०७ |
| ३ | अनु.जमाती | १४ | ३५.८९ |
| ४ | लाभ न मिळालेले | ११ | २८.२२ |
| | एकूण कुटुंब | ३९ | १०० |

शासनाने लोकांसाठी मोफत घरकुल योजने अंतर्गत मुलभुत गरजेची पुर्तेता करण्यासाठी ही योजना सुरू केली. तरी सुध्दा या योजनेचा लाभ फक्त २८ लोकांनी घेतला आहे. तरी अजूनही काही लोक या सुविधेपासून वंचित आहेत. यांना शासकीय योजनेच्या लाभार्थ्या मध्ये आणण्यासाठी शासनाला लोक प्रतिनिधी व शासकीय कार्यालय यांच्याशी मेळ घालणा-या व्यक्तीची नियुक्ती ग्रामपंचायत च्या अधिकारात कत्रांटी तत्वावर करण्याची आवश्यकता आहे.जेणेकरून शासकीय आवास योजनेतुन कोणताही गरजु व्यक्ती या पासनू दुर्लक्षित राहू नये व गावाचे निवारा संबधीत प्रश्न सुटण्यास मदत होईल.

## निष्कर्ष:-

भंडारा जिल्हातील लाखनी तालुक्यातील आदिवाशी , दुर्लक्षित , कमी लोकसंख्या असलेल्या गावातील सोईसुविधेचा अध्ययन करून समाज परिवर्तनाच्या दृष्टीकोनातुन शासनाच्या नियोजनात हे गाव आणण्याच्या दृष्टीकोनातून मल्काझरी गावाची निवड करून येथील लोकसंख्या ही आदिवासी लोकांची अधिक असून येथील हवामान उष्ण व विषम आहे . पर्जन्य १३०० मी.मी. ते १४०० मी.मी पर्यंत होते. येथील मृदा पोयटयाची असून तांबुस रंगाची आहे. एकंदरित येथील हवामान भात शेतीसाठी आदर्श आहे. या गावामध्ये बहुतांस लोक शेती व्यवसायात गुंतलेले असून शेत मजूरी व शेती निगडीत व पुरक उदा. कुक्कुटपालन, शेळीपालन, मवेशीपालन , मासेमारी व जंगली क्षेत्रात लाकुडतोड, लाख,डिंक , मध गोळा करणे इत्यादी व्यवसायच्या माध्यमातून उदरनिर्वाह करीत

असतात. अनुसुचित जमातीच्या लोकांचा राहणीमानाचा स्तर व शासकीय योजनेपासून अजूनही किती प्रमाणात लोक वंचित आहेत याची अध्ययन करण्यासाठी मलकाझरी या गावाचे सामाजिक, आर्थीक सर्वेक्षण केले असता असे आढळून आले की, जवळपास सर्वच लोक साक्षर असून फक्त ९.८७ टक्के निरक्षर आहेत वाढत्या लोकसंख्येसाठी शासनाने लोकांमध्ये केलेल्या जनजागृतीसाठी साक्षरता, वैदयकीय सुविधा यांचा लाभ सर्व लोक घेत असतात . गावातील स्त्रियांचे लिंग गुणोत्तर प्रमाण पुरूषांच्या तुलनेत अधिक आहे. व अनुसुचित जाती व जमातीच्या समुदायाचे प्रमाण ८२.१५ टक्के असून आजही या गावामध्ये शासकीय योजनेतून निवासी योजनेचा लाभ २८.२२ टक्के लोकांना घेता आला नाही. मात्र वैद्यकीय सोईसुविधेच्या लाभ सपूंर्ण ग्रामीण भागातील लोक घेत आहेत.

## उपाययोजना :-

शासनाला शहरापासून खेडयापर्यंत शिक्षणासोबतच अजूनही या अनुसुचित जाती जमातीच्या लोकांसाठी शासनाने विविध योजनेच्या माध्यमातून त्याचा वैद्यकीय सुविधतेमध्ये आधुनिक यत्रंसामुग्री अदयावत करून ग्रामीण रूग्नालयांशी जोडण्यासाठी वाहतुकीची सोय करणे गरजेचे आहे. तसेच राहणीमानाचा स्थर वाढविण्यासाठी शासकीय सुविधेच्या माध्यमातुन ग्रामपंचायत स्तवावर मुलभूत सोईसुविधेकडे लक्ष देणारी कत्रांटी तत्त्वावर तज्ञांची नियुक्ती करणे गरजेचे आहे

## संदर्भसूची :-

१. भारतीय जनगनना पुस्तिका :भंडारा जिल्हा २०११
२. महसुल कार्यालय लाखनी तालुका प्रकाशने
३. ग्रामपंचायत कार्यालय मलकाझरी आदर्श तक्ता
४. एम.एस.इ.बी. कार्यालय लाखनी प्रकाशने